पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ९

**सभावृत्तांत**

दिनांक : ०७ / ०९ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक ०७ / ०९ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती

२) मा. विनोद जयवंत नढे

३) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.ढेरे, मा.कारचे - सहा.आयुक्त, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.पठाण, मा.थोरात, मा.कपिले, मा.शिर्के, मा.जाधव, मा.साळवी - कार्य.अभियंता हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**मा.सभापती -** सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने शुक्रवार दिनांक २१/०९/२०१२ दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ९

**सभावृत्तांत**

( दिनांक ०७/०९/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक : २१ / ०९ / २०१२ वेळ : दुपारी २ :४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक ०७/०९/२०१२ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २१ / ०९ / २०१२ रोजी दुपारी २:४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. शैलजा शितोळे
६) मा. नेटके सुमन राजेंद्र
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.शिर्के, मा.पठाण, मा.दुधेकर, मा.जाधव, मा.साळवी, मा.चिंचवडे, मा.लडकत, मा.ढगे, मा.दांगट - कार्य.अभियंता हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**दिनांक १७/०८/२०१२ (दु.३.०० व ४.००) व ३१/०८/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक :- ५१ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- स्थापत्य
सुचक : मा. धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा.सुमन नेटके
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/श.अ.तां/१/कावि/१४८/२०१२, दि.२१/०८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामांस / बेकायदेशिर बांधकामांस यापुढे सर्व सेवा सुविधा ( उदा. पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते, दिवाबत्ती इ.) देणे बंद करणेबाबतच्या निर्णयास तसेच, यापुढे या महानगरपालिका हद्दीतील बांधकामांना विद्युत

जोड देणेपूर्वी महानगरपालिकेकडील बांधकाम चालू करण्याचा दाखला / महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडील नाहरकत दाखला सादर केल्यानंतरच विद्युत जोड देणेबाबत कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना कळविणेस तसेच ज्या ठिकाणी १०० टक्के अनधिकृत बांधकाम झालेले असेल त्याच ठिकाणी रस्ते व दिवाबत्तीची सोय न करुन देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५२ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- प्रशासन
सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/८९०/२०१२, दि.३१/०८/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री. प्रकाश कदम, अति.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि.०७/१०/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १२११ /२०१२
दिनांक - २४ / ०९ / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.